महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
Email Id: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र.:विकाऔ/ओएस/पदोन्नती/२०२१/ 281 दिनांक : 28 JAN 2021

**कार्यालयीन आदेश**

संदर्भ:-
१ महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईसी-३३९६/(७३७६)/ताशि-१, दि.१०/०४/१९९७.
२ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र. ६४/०१/१६-ब, दि.२५/०५/२००४.
३ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.१९८/कार्या.१२, दि.१८/०६/२०१६.
४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक आरटीआर.२०१४/प्र.क्र.३५५/१२. दि.०६/०६/२०१७.
५ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक आरटीआर.२०१४/प्र.क्र.३३२/का-१२. दि.०६/०१/२०१८.
६ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र. ४६२/का-१२. दि.२८/०५/२०१८.
७ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्रमांक बीसीसी २०१७/प्र.क्र. ३१२ ए/१६-ब, दि.२९/१२/२०१७.
८ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१८/प्र.क्र. १५९/कार्यासन १२, दि.०१/०८/२०१९.
विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक २२/०१/२०२१.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद या स्तरावर गठीत विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारसी विचारात घेऊन संदर्भिय क्रमांक (१) च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकाराचा वापर करुन, तसेच संदर्भिय क्रमांक (२) ते (७) चे शासन निर्णयामधील तरतूदींनुसार या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्था/कार्यालयातील **"गट-ड"** (वेतन मॅट्रिक्स मधील वेतन स्तर एस-०१ : १५०००-४७६००) पदावरील कर्मचाऱ्यांना **"गट-क" "कनिष्ठ लिपीक"** (वेतन मॅट्रिक्स मधील वेतन स्तर एस-०६ : १९९००-६३२००) या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यांत येत असून त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ५ मध्ये दर्शविण्यांत येत आहे.

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम व संस्था/कार्यालय | कर्मचाऱ्यांच्या जातीचा मूळ प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री एस. एम. मुंदडा, हमाल, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | खुला | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, जालना |
| २ | श्री आर. ए. मापारे, शिपाई, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | खुला | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड |
| ३ | श्री एस. एन. कळंम, हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | खुला | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर |
| ४ | श्री एफ. जी. गव्हाणे, पहारेकरी, शासकीय तंत्रनिकेतन, बीड | खुला | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली |
| ५ | श्री एस. बी. भोई, शिपाई, म. रा., तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | भज-ब | खुला | म. रा., तंत्रशिक्षण मंडळ, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद |
| ६ | श्री सी. बी. वखरे, शिपाई, शासकीय तंत्रनिकेतन, बीड | इमाव | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली |

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव, पदनाम व संस्था/कार्यालय | कर्मचाऱ्यांच्या जातीचा मूळ प्रवर्ग | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७ | श्री व्ही. आर. सावळे,<br>हमाल, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | इमाव | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर |
| ८ | श्री डी. जी. झंप्पलवाड,<br>हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर | भज-ब | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, जिंतूर |
| ९ | श्री एस. एन. काझी,<br>शिपाई, पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर | खुला | खुला | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर |
| १० | श्री एम. एम. सुर्यवंशी,<br>शिपाई, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद | भज-क | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद |
| ११ | श्री डी. डी. सुवर्णकार,<br>हमाल, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर | इमाव | खुला | पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर |
| १२ | श्री यु. डब्ल्यू. काशीद,<br>हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, बीड | इमाव | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, बीड |
| १३ | श्री शेख अब्दुल शेख रज्जाक,<br>पंप परिचर, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | खुला | खुला | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर |
| १४ | श्री डी. एस. सोनवणे,<br>शिपाई, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | अनु. जाती | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद |
| १५ | श्री जे. एस. डोणे,<br>हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड | भज-क | खुला | पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर |
| १६ | श्री बी. डी. शेळके,<br>हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | भज-क | खुला | शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद |
| १७ | श्री एस. एम. वाखुरे,<br>हमाल, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद | खुला | खुला | शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद |

उपरोक्त कर्मचाऱ्यांची पदोन्नती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यांत येत आहे.

१) पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवा जेष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या निकालाच्या अधीन राहून भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक १६-ब, दिनांक २९/१२/२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार पदोन्नतीच्या कोटयातून खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती करण्यात येत आहे.

२) शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतच्या योजनेखालील पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ देण्यात आलेले असेल व अशा कर्मचाऱ्यांनी उपरोक्त पदोन्नती नाकारली तर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संबंधितांना देण्यात आलेले लाभ तात्काळ थांबविण्यात येईल व त्यांना प्रत्यक्ष पदोन्नती नंतर सदरचा लाभ देण्यात येईल.

३) पदोन्नतीमुळे संबंधिताना वेतननिश्चिती बाबतचा विकल्प शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पीएवाय/१०८२/सीआर-१०० (एक) एसईआर-३ दिनांक ०६/११/१९८४ मधील तरतुदीनुसार रुजू होण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कार्यालयास सादर करावा लागेल. तथापि संबंधित कर्मचाऱ्यास सुधारित आश्वासित प्रगती योजनेंतर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी लागू करण्यात आली असल्यास त्यांची पुनःश्च वेतननिश्चिती होणार नाही.

४) कर्मचाऱ्यांच्या पदोन्नत्या हया व्यापक लोकहितार्थ व प्रशासकीय कारणास्तव करण्यांत आल्या असल्याने सदर आदेशाविरुध्द कोणत्याही अभिवेदनाचा विचार केला जाणार नाही.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी त्वरीत होणेसाठी संस्थाप्रमुखांनी संबंधित कर्मचाऱ्यास त्वरित कार्यमुक्त करावे.

६) सदरची पदोन्नती ही संबंधितांच्या संस्थेने / या कार्यालयाकडे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे, विविध सेवा जेष्ठता / शासन निर्णयातील तरतूदींनुसार निर्गमित केलेले आहेत. परंतु समितीच्या बैठकीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या संदिग्ध माहितीमुळे किंवा माहितीच्या विश्लेषणात्मक आकलनातील संदिग्धतेमुळे चुकीने पदोन्नतीचा लाभ मिळाल्याचे / करण्यात आल्याचे कोणत्याही वेळी निदर्शनास आल्यास देण्यात आलेला पदोन्नतीचा लाभ पूर्वलक्षी प्रभावाने काढून घेण्यात येतील या अटीवर देण्यात येत आहे.

७) सदरील पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवा जेष्ठतेचा हक्क असणार नाही.

८) उपरोक्त कर्मचाऱ्यांची सद्य:स्थितीत पदोन्नतीने तात्पुरत्या स्वरुपात संबंधित संस्थेत रिक्त असलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे. तथापि, नियतकालीक बदल्या-२०२० ला अनुसरुन विनंती बदलीचे प्रस्ताव यापूर्वीच संचालनालय / शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आलेले आहेत. सदरच्या विनंती बदली प्रस्तावास संचालनालयाकडून / शासनाकडून मान्यता मिळाल्यास बदलीने पदस्थापनेचे कार्यालयीन आदेश निर्गमित होतील, त्याचे परिणामी उपरोक्त कर्मचाऱ्यांना ज्या आस्थापनेवर पद रिक्त होईल त्या ठिकाणी या आदेशान्वये देण्यात आलेली तात्पुरती पदस्थापना रद्द करण्यात येऊन सुधारित पदस्थापनेचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

९) महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्यात) नियम, १९९९ व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र. ४६२/का-१२. दि.२८/०५/२०१८ या नुसार संबंधित कर्मचाऱ्यांना संगणक हाताळणी प्रमाणपत्र विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

१०) पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पदोन्नतीच्या पदावर रुजु व्हावे. उपरोक्त पदोन्नतीसाठी निवड झालेल्या कर्मचाऱ्यांने पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दर्शविल्यास शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र/३०३/का-१२, दिनांक १२/०९/२०१६ अन्वये त्यांचे पूढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूचीत नाव विचारात घेतले जाणार नाही व पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्याला आश्वासित प्रगती योजनेंतर्गत लाभ दिला असल्यास लगतचा लाभ काढून घेण्यात येईल. तसेच कर्मचाऱ्यांने कायम स्वरुपी पदोन्नती नाकारल्यास त्याचा पुढील कोणत्याही निवडसूचीकरीता विचार करण्यात येणार नाही. तसेच वरच्या पदावर पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर पदोन्नतीचे पद स्वीकारण्यास नकार दिलेल्या कर्मचाऱ्यांची वरच्या पदावरील सेवाजेष्ठता ही ज्यावेळी संबंधित कर्मचारी पुढील निवडसूचीत पदोन्नतीस पात्र ठरेल व प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदावर रुजू होईल. त्या दिनांकापासून विचारात घेतली जाईल व त्या पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना मानीव दिनांक प्राप्त होणार नाही.

**संबंधित कर्मचाऱ्यांनी पदोन्नतीच्या आदेशातील वरील अटी मान्य असल्याचे हमी पत्र संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडे सादर करावे, त्यानंतरच प्राचार्य यांनी रितसर कार्यमुक्तीचे आदेश निर्गमित करावे.**

संबंधित कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे पदग्रहण अवधी, दैनंदिन भत्ता व प्रवासभत्ता अनुदेय राहील.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय औरंगाबाद.

प्रत:- १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२ प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद / शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद / जालना / अंबड / हिंगोली / जिंतूर / नांदेड / उस्मानाबाद / पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर / शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर यांना कळविण्यात येते की, पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना त्वरित कार्यमुक्त करावे/रुजू करुन घ्यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३ प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद / शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद / जालना / अंबड / हिंगोली / जिंतूर / नांदेड / उस्मानाबाद / पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर / शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, लातूर यांना कळविण्यात येते की, सदर **"गट-क"** संवर्गातील **"कनिष्ठ लिपीक"** हया पदावरील पदोन्नतीच्या अनुषंगाने त्यांची मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रांची पडताळणी आपल्या स्तरावर करुन व ती योग्य व खरी असल्याचे आढळून आल्यानंतरच त्यांना पदोन्नतीच्या पदावर रुजू करुन घ्यावे तसेच त्या प्रमाणपत्रांची सत्यप्रत संबंधितांच्या निवड नस्तीस जतन करावी.

४ मा. कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, औरंगाबाद / जालना / हिंगोली / जिंतूर / नांदेड / उस्मानाबाद /लातूर यांना मानार्थ

५ मा. उपकोषागार अधिकारी, उपकोषागार कार्यालय, जिंतूर / अंबड यांना मानार्थ

६ संबंधित कर्मचारी यांना (संस्था प्रमुखा मार्फत)

७ निवड नस्ती.